# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 09 वाजून 20 मिनिटं

**दिनांकः19.07.2024** **वारःशुक्रवार**

---

**ठळक बातम्या**

संसदेच्या पावसाळी अधिवेशनात केंद्र सरकार सहा नवीन विधेयकं सादर करणार

देशातील इलेक्ट्रॉनिक्स वस्तू निर्मिती क्षेत्राची उलाढाल 2030पर्यंत पाचशे बिलियन डॉलर्सपर्यंत नेण्याचं सरकारचं उद्दिष्ट

ग्रामीण-शहरी विभागातील आर्थिक विषमतेची दरी कमी होत असल्याचा रिझर्व्ह बँकेचा अहवाल

आणि

महिलांच्या आशिया चषक टी-ट्वेन्टी क्रिकेट स्पर्धेत आज भारत-पाकिस्तान आमने सामने

आता सविस्तर बातम्या

**संसद**

पुढच्या आठवड्यात सुरू होत असलेल्या संसदेच्या पावसाळी अधिवेशनात केंद्र सरकार नवीन सहा विधेयकं सादर करणार आहे. आपत्ती व्यवस्थापन कायद्यामध्ये काही सुधारणा सुचविण्यात आल्या असून त्याच्यासह अर्थविषयक विधेयकाचा यामध्ये समावेश आहे. विमान कायदा 1934 च्या ऐवजी वायुयान विधेयक 2024 यामध्ये मांडण्यात येणार असून नागरी हवाई वाहतूक क्षेत्रात व्यवसाय करणं सुलभ व्हावं यासाठी त्यामध्ये विशेष तरतुदी करण्यात आल्या आहेत. काल लोकसभा सचिवालयानं या आगामी विधेयकांची सूची जाहीर केली. 22 तारखेला संसदेच्या अधिवेशनाला प्रारंभ होणार असून ते 12 ऑगस्टपर्यन्त चालेल. 23 तारखेला केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतरामन अर्थसंकल्प सादर करतील. इतर विधेयकांमध्ये बॉयलर विधेयकाचा समावेश असून स्वातंत्र्यपूर्व काळातील कॉफी आणि रबर विधेयकांच्या ऐवजी ते मांडण्यात येणार आहे.दरम्यान, लोकसभा अध्यक्ष ओम  बिर्ला यांनी कामकाज सल्लागार समिती स्थापन केली असून ही समिती संसदेतील दैनंदिन कामकाजाचा प्राधान्यक्रम निश्चित करण्याचं काम करेल. बिर्ला यांच्या अध्यक्षतेखालील या समितीनं कालपासून कामाला प्रारंभ केला. या समितीमध्ये अनुराग ठाकूर, अरविन्द सावंत, सुदीप बंदोपाध्याय, निशिकांत दुबे, गौरव गोगोई आदी 14 सदस्यांचा समावेश आहे.

**नीती आयोग**

इलेक्ट्रॉनिक्स वस्तू निर्मिती क्षेत्रात 2030पर्यंत भारताचा व्यापार 5शे बिलियन डॉलर्स पर्यंत नेण्याचं उद्दिष्ट असल्याचं नीती आयोगानं म्हटलं आहे. नीती आयोगाचे उपाध्यक्ष सुमन बेरी यांनी काल नवी दिल्लीत "इलेक्ट्रॉनिक्स - वैश्विक मूल्य साखळीत भारताची भागीदारी अहवाल प्रसिद्ध केला,त्यात हा अंदाज वर्तवण्यात आला आहे . यामध्ये देशातील इलेक्ट्रॉनिक्स क्षेत्राचं व्यापक विश्लेषण करण्यात आलं असून, यात इलेक्ट्रॉनिक्स वस्तूंचं डिझाइन ,उत्पादन , वितरण आणि निर्यात यांचा समावेश आहे . या अहवालानुसार, 2023 मध्ये या क्षेत्रात भारताचा व्यापार 155 बिलियन डॉलर्स झाला आहे 2017 मध्ये तो केवळ 48 बिलियन डॉलर्स होता, 2023 मध्ये तो दुप्पट अर्थात 101 डॉलर्सने वाढला यामध्ये मुख्यतः देशी मोबाइल उत्पादनाचा सर्वात जास्त वाटा आहे .

**नीट**

नीट युजी 2024 ही परीक्षा देणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांचा निकाल उद्या, म्हणजे शनिवारी दुपारी 12 वाजेपर्यंत जाहीर करण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने राष्ट्रीय चाचणी संस्थेला दिले आहेत. नीट युजी परीक्षा गैरव्यवहार प्रकरणी दाखल झालेल्या 40 याचिकांची सुनावणी काल सरन्यायाधीश न्यायमूर्ती धनंजय चंद्रचूड यांच्या अध्यक्षतेखालील पीठासमोर झाली; त्यावेळी न्यायलयाने हे निर्देश दिले. विद्यार्थ्यांची ओळख जाहीर न करता, शहर आणि परीक्षा केंद्राच्या तपशिलासह निकाल संकेतस्थळावर जाहीर करावा, असं सर्वोच्च न्यायालयाने म्हटलं आहे. 23 लाखांपेक्षा जास्त विद्यार्थ्यांचं भवितव्य या परीक्षेवर अवलंबून असल्याने ही परीक्षा रद्द करणं हा अखेरचा पर्याय असेल, असं न्यायालयानं स्पष्ट केलं. या प्रकरणी पुढची सुनावणी येत्या सोमवारी होणार आहे.

**पथकर आकारणी**

देशातील सर्व राष्ट्रीय महामार्ग आणि द्रुतगती महामार्गावर प्रवास करणाऱ्या वाहनांच्या दर्शनी भागावर फास्ट टॅग नसल्यास दंड म्हणून दुप्पट पथकर वसूल करण्याचे निर्देश राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणानं सर्व पथकरनाक्यांना दिले आहेत. अनेक वाहने दर्शनी भागातील काचेवर फास्ट टॅग लावत नाहीत त्यामुळे पथकर वसुलीत वेळ जातो आणि वाहनांच्या लांब रांगा लागतात आणि वाहतुकीचा खोळंबा होतो. त्यामुळे महामार्ग प्राधिकरणाने एक हजार पथकर नाक्यांना याबाबत कटोर कारवाईच्या सूचना केल्या आहेत. देशातील 45 हजार किलोमीटर लांबीच्या राष्ट्रीय महामार्गावरून दररोज सुमारे 8 कोटी नागरिक फास्ट टॅगचा वापर करून प्रवास करतात.

**रिझर्व्ह बँक**

भारतीय अर्थव्यवस्थेला गती मिळण्याच्या आशादायक संकेतांसह चालू आर्थिक वर्षाच्या दुसऱ्या तिमाहीची सुरुवात झाल्याचं भारतीय रिझर्व्ह बँकेनं म्हटलं आहेत. बँकेच्या मासिक वृत्तानुसार,

कृषिक्षेत्रात होणाऱ्या सुधारणा आणि वाढत्या ग्रामीण खर्चाचं मागणीमध्ये होणारं रूपांतर सकारात्मक अर्थव्यवस्थेसाठी सकारात्मक ठरत असून राष्ट्रीय सांख्यिकी विभागानं (NSSO) अलीकडेच केलेल्या मासिक दरडोई खर्चाच्या सर्वेक्षणानुसार, या क्षेत्रात ग्रामीण खर्च शहरी विभागांपेक्षा अधिक ठरला आहे. त्यामुळे ग्रामीण-शहरी विभागातील आर्थिक विषमतेची दरी कमी होत आहे. मनरेगासारख्या योजनांचे मजुरीचे वाढलेले दर आणि शहरी स्थलांतरामुळे ग्रामीण कुटुंबांना पाठवला जाणाऱ्या पैशाचं  मोठं प्रमाण यामुळे ग्रामीण कुटुंबांची खर्च करण्याची क्षमता वाढत चालली असल्याचं या अहवालात म्हटलं आहे.

**भूतान  दौरा**

परराष्ट्र सचिव विक्रम मिसरी आजपासून भूतानच्या दोन दिवसांच्या अधिकृत दौऱ्यावर जाणार आहेत. परराष्ट्र सचिवपदाची सूत्रं स्वीकारल्यानंतर त्यांचा हा पहिलाच परदेश दौरा असेल. या भेटीदरम्यान, मिस्री भूतानचे राजे तसंच  तिथल्या नगरिकांशीही संवाद साधणार आहेत. भूतानचे पंतप्रधान, परराष्ट्र व्यवहारमंत्री  आणि परराष्ट्र व्यापारमंत्री यांची भेटही मिसरी  घेणार असून त्यांचे भूतानचे समकक्ष आणि इतर सरकारी वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या भेटीगाठीही या दौऱ्यात होणार आहेत. भारत-भूतान विकास सहकारी चर्चा या कालावधीत होणार असून दोन्ही परराष्ट्र सचिव त्याचं  सहअध्यक्षपद भूषवतील. ही भेट भारत आणि भूतानमधील नियमित उच्चस्तरीय आदानप्रदान  परंपरेनुसार असून भारत सरकार आपल्या ‘शेजारी प्रथम’ या  धोरणाला सर्वोच्च प्राधान्य देत असल्याचं  अधोरेखित करणारी आहे, असं परराष्ट्र व्यवहार मंत्रालयानं याबाबत प्रसिद्ध केलेल्या निवेदनात म्हटलं आहे.

**विद्यार्थी निदर्शनं**

बांगलादेशमध्ये सरकारी नोकऱ्यांमधील राखीव अर्थात आरक्षित जागांबाबतच्या धोरणात सुधारणा करण्याच्या मागणीसाठी विद्यार्थ्यांची जोरदार निदर्शनं सुरू असून त्यावरून राजधानी ढाका आणि देशाच्या इतर भागात मोठा हिंसाचार उसळला आहे. 1971 मध्ये पाकिस्तानपासून बांगलादेश स्वतंत्र करण्यासाठीच्या युद्धात लढलेल्या वीरांच्या नातेवाईकांसाठी सार्वजनिक क्षेत्रातील काही नोकऱ्या राखून ठेवण्यात आल्या असून या धोरणाच्या विरोधात ढाका आणि इतर शहरांमधील विद्यापीठातील विद्यार्थी गेले काही दिवस मोर्चे काढत आंदोलन करत आहेत. वाढत्या हिंसाचारामुळे काल अधिकाऱ्यांनी मेट्रो रेल्वे बंद केल्या. तसंच काल दुपारपासून राजधानी ढाक्याकडे येणारी – जाणारी रेल्वेसेवा बंद आहे.

**वाघनखं**

छत्रपती शिवाजी महाराज यांनी प्रतापगडावर केलेल्या शौर्याचं प्रतीक असलेली वाघनखं विशेष सुरक्षेत साताऱ्यात आणण्यात आली आहेत. त्याच्या पाहणीसाठी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे,

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, सांस्कृतिक कार्यमंत्री सुधीर मुनगंटीवार आज साताऱ्यात येणार असून त्यांच्या उपस्थितीत शिव शस्त्र शौर्य गाथा दालनाचं उद्घाटन होणार आहे. ही वाघनखं उद्यापासून सामान्य नागरिकांना पाहायला मिळतील.

**कीर्ती**

खेलो इंडिया राइजिंग टॅलेंट आयडेंटीफिकेशन अर्थात कीर्ति या केंद्र सरकारच्या कार्यक्रमाच्या दुसऱ्या टप्प्याचं उद्घाटन आज केंद्रीय युवक कल्याण आणि क्रीडा मंत्री मानसुख मांडविय यांच्या हस्ते नवी दिल्लीत होणार आहे . याबाबत क्रीडा मंत्रालयाने माहिती देताना सांगितल की  कीर्ती कार्यक्रमाच्या माध्यमातून आंतर राष्ट्रीय क्रीडा प्रकारांच्या मानकांनुसार आय टीसी उपकरणांसहित खेळू शकणाऱ्या देशातील प्रतिभावान खेळाडूंचा शोध घेणे हा उद्देश आहे. 2024-25 या वर्षात देशातील सर्व राज्यातील मिळून 20 लाख खेळाडूंच मूल्यांकन करण्यात येणार आहे . या कार्यक्रमाचा पहिला  टप्पा यावर्षी 12 मार्चला चंदीगड  इथ सुरू करण्यात आला.

**महिला क्रिकेट**

महिलांच्या आशिया चषक टी- ट्वेंटी क्रिकेट स्पर्धेला आजपासून श्रीलंकेत दाम्बुला इथं सुरुवात होत आहे. स्पर्धेत आज भारताची लढत पारंपरिक प्रतिस्पर्धी असलेल्या पाकिस्तानशी होणार आहे. भारतीय प्रमाण वेळेनुसार संध्याकाळी 7 वाजता हा सामना सुरू होईल. दुपारी होणाऱ्या या स्पर्धेतल्या पहिल्या सामन्यात युएई आणि नेपाळ आमने सामने असतील.

**भारतीय संघ**

श्रीलंकेविरुद्ध आगामी वीस षटकांच्या  तीन सामन्यांच्या मालिकेमध्ये सूर्यकुमार यादव भारतीय संघाचं नेतृत्व करणार आहे. या महिन्याच्या 27 तारखेपासून ही मालिका सुरू होत आहे. दरम्यान, पुढच्या महिन्यात सुरू होणाऱ्या 50 षटकांच्या मालिकेसाठी याच संघात रोहित शर्मा आणि विराट कोहली यांचा समावेश करण्यात आला आहे. दोन्ही मालिकांमध्ये शुभमन गील  संघाचा उपकर्णधार असेल. 20 षटकांच्या  मालिकेसाठी भारतीय संघात यशस्वी जयस्वाल, रिंकू सिंग, रियान पराग, ऋषभ पंत, संजू सॅमसन, हार्दिक पंड्या, शिवम  दुबे , अक्षर पटेल, वॉशिंग्टन सुंदर, रवी बिश्नोई , अर्शदीप सिंग, खालील अहमद आणि मोहम्मद सिराज यांचा समावेश करण्यात आला आहे.

**टेनिस**

स्वीडिश खुल्या टेनिस स्पर्धेत पुरुष एकेरीच्या उपउपांत्य फेरीत आज संध्याकाळी राफेल नदालचा मुकाबला अर्जेनटिनाच्या मारीयानो नव्होने यांच्याबरोबर होणार आहे. भारतीय प्रमाणवेळेनुसार संध्याकाळी साडेचार वाजता हा सामना  खेळला जाणार आहे. त्यापूर्वी ब्रिटनच्या कॅमेरून नोरी याचा

6-4,6-4 असा सरळ सेट्समध्ये पराभव करून नदाल  या फेरीत पोहोचला. चौथ्या मानांकीत मारीयानो नव्होने यानं  भारताच्या सुमित नागल याला पराभूत करत या फेरीत प्रवेश केला.

**हवामान**

भारतीय हवामान खत्याने आज गुजरात, गोवा, महाराष्ट्र, आंध्र प्रदेश आणि तेलंगण या राज्यात अतिमुसळधार पावसाचा इशारा दिला आहे. यामध्ये गुजरात, आंध्र प्रदेश आणि कर्नाटकातील किनारी प्रदेश, मध्य महाराष्ट्र , गोवा यांचा समावेश आहे. तसच येत्या चार दिवसात मध्य प्रदेश , विदर्भ , उत्तर कर्नाटक, ओडिशा आणि छत्तीसगड मध्ये मुसळधार पाऊस पडेल असा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे .

**याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.**